भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सह्योगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदुर्ग
## कालावधी (दिनांक ०८.०७.२०२० ते १२.०७.२०२०)

अंक ५३/२०२० | दिनांक ०७.०७.२०२० | कालावधी ५ दिवस

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (३०/०६/२०२० ते ०६/०७/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०८/०७/२०२० ते १२/०७/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/०६ | ०१/०७ | ०२/०७ | ०३/०७ | ०४/०७ | ०५/०७ | ०६/०७ | दिनांक | ०८/०७ | ०९/०७ | १०/०७ | ११/०७ | १२/०७ |
| १३५.० | १४.२ | ७२.२ | १७४.४ | १२२.४ | ५९.० | १०.४ | पाऊस (मि. मी) | ४६ | ७३ | ६६ | ४१ | ६८ |
| ३१.४ | ३०.० | ३०.० | २९.५ | २९.६ | ३१.० | ३१.० | कमाल तापमान (अं. से) | ३१ | ३० | ३१ | ३० | ३० |
| २३.७ | २४.० | २३.२ | २२.२ | २२. ५ | २३.० | २५.० | किमान तापमान (अं. से) | २४ | २३ | २२ | २३ | २३ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ६ | ८ | ८ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९६ | ९२ | ९२ | ९८ | १०० | ९२ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९१ | ९२ | ९१ | ९१ | ९३ |
| ९५ | ७८ | ९० | ९६ | ९८ | ७३ | ७६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८४ | ८१ | ७७ | ७६ | ७३ |
| ०.४ | ०.५ | १.० | ०.६ | ०.३ | ०.६ | २.६ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०१३ | ००६ | ००६ | ००६ | ००७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | पूर्वोत्तर/ इशान्य | स्थिर | सकाळ – वा-याची दिशा | नैऋत्य कडे | दक्षिणे कडे | नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ आग्नेय कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्य कडे |
| स्थिर | पूर्वोत्तर/ आग्नेय | स्थिर | स्थिर | स्थिर | पूर्वोत्तर/ आग्नेय | पश्चिमोत्तर / नैऋत्य | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | १५४८.३ | १५४५.१ | ५८७.६ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये तापमान स्थिर राहण्याची शक्यता आहे, त्याचबरोबर पुढील पाच दिवसामध्ये बहुतांश ठिकाणी मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान आर्द्र व पूर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे. इशारा: सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ८, १० व ११ जुलै रोजी तुरळक ठिकाणी जोरदार तर दिनांक ९ व १२ जुलै रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, | रोपवाटीका व्यवस्थापन व पुनर्लागवड | ❖ पुढील पाच दिवसात जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्यामूळे व भात खाचरात पाणी पातळी सुस्थितीत राखण्यसाठी खाचरातील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>❖ या आठवडयात मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी भात पिक 20 ते 25 दिवसांच्या रोपांच्या अवस्थेत आहे. शेतक-यांनी पूर्नलागवडीची कामे हाती घ्यावीत व ती लवकरात लवकर पूर्ण करावीत. पूर्नलागवडीसाठी रोपे 10 ते 15 सेमी उंचीची, 5-6 पाने फुटलेली व 20-22 दिवसांची असावीत.<br>❖ शेवटच्या चिखलणीच्यावेळी प्रती गुंठा क्षेत्रास 870 ग्रॅम यूरीया, 3 किलो सिंगल सुपर फॉस्फेट व 830 ग्रॅम म्यूरेट ऑफ पोटॅश या प्रमाणात खते द्यावीत. हिरवळीच्या खतासाठी गिरीपुष्पाचा पाला हेक्टरी 10 टन याप्रमाणे (100 किलो प्रती गुंठा) लावणीपूर्वी शेतात गाडल्यास नत्राच्या मात्रेत बचत करता येते.<br>❖ भाताची लावणी जमिनीच्या मगदूरानुसार हळव्या जातींसाठी 15 x 15 सेमी (44 चूडे प्रती चै.मी.) आणि निमगरव्या व गरव्या जातींसाठी 20 x 15 सेमी (33 चूडे प्रती चै.मी.) अंतर ठेवावे. लावणी सरळ व उथळ करावी. संकरीत भातासाठी एकाठिकाणी एकच जोमदार रोप लावावे. भात लागवडीसाठी चारसुत्री लागवड पदध्तीचा अवलंब करावा. |
| नागली | रोपवाटीका व्यवस्थापन व पुनर्लागवड | रिमझिम पाउस पडत असताना किंवा वातावरण ढगाळ असताना नागलीची लागवड करावी. रोपे उताराच्या आडव्या दिशेने ठोबा पद्धतीने ओळीत उथळ किंवा उभी लावावीत. अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी ३० दिवसांची रोपे एका ठोंब्यात २ याप्रमाणे दोन ओळीत २० सेमी आणि २ रोपात १५ सेमी अंतर ठेवून लावावेत. |
| भुईमुग | पेरणी | डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोकण गौरव व ट्रॉम्बे कोकण (टपोरा) तसेच टी.जी.२६, टी.ए.जी. २४, टी.पी.जी. ४१ या जातींची निवड करावी. प्रती हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. सततचा पाऊस व ओलाव्यामूळे भुईमूगामध्ये येणाऱ्या मर रोगाचा प्रादूर्भाव टाळण्यासाठी थायरम३ग्रॅम/किलो बियाणे या प्रमाणात चोळावे. भुईमूगाची पेरणी पावसाचा अंदाज पाहून करावी |
| आंबा | नवीन लागवड | तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाच्या शक्यतेमुळे नवीन लागवड केलेल्या आंबा कलमाना पावसाची उघडीप पाहून काठीने आधार द्यावा व मातीची भर देण्यात यावी<br>आंबा फळबागांमध्ये काढणी पूर्ण झाल्यास लॉरेन्थस परजीवी, मृत लाकूड व रोगट फांद्या तोडून 1% बोर्डो पेस्ट कापलेल्या पृष्ठभागावर लावावी त्याचबरोबर आंबा बाग स्वच्छ ठेवावी.<br>येत्या पाच दिवसामध्ये आद्रतेचे प्रमाण वाढणार असल्यामूळे आंबा पिकावरील नवीन पालवीवर करपा व भूरी रोगाचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता आहे व प्रादूर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी पावसाची उघडीप पाहून थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातून फवारावे. |
| काजु | नवीन लागवड | तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाच्या शक्यतेमुळे नवीन लागवड केलेल्या काजू कलमाना पावसाची उघडीप पाहून काठीने आधार द्यावा व मातीची भर देण्यात यावी<br>काजुवर खोडिकडा (रोठा) या किडिचा प्रादूर्भाव आढ्ळून आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादूर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारून टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजूमध्ये काढणीनंतर जून्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ व सुपारी | फळ विकास | तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाच्या शक्यतेमूळे नवीन लागवड केलेल्या नारळ व सूपारीच्या रोपांना पावसाची उघडीप पाहून काठीने आधार द्यावा व मातीची भर देण्यात यावी<br>नारळावरील पानांवरील ठिपके, सुपारीवरील फळगळ या रोगांच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये 1 टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| भाजीपाला | पेरणी/ पुनर्लागवड | काही ठिकाणी वेलवर्गीय भाज्यांमध्ये वेल सूटायला सूरुवात झालेली आहे. त्याना काठीचा आधार द्यावा व मातीची भर द्यावी. तसेच भेंडी, गवार इ. भाज्यांच्या लागवडीच्या ठिकाणी अती पावसामूळे पाणी साठणार नाही याची खबरदारी घ्यावी. तसेच वांगी, मिरचीची रोपे तयार असल्यास पाण्याचा उत्तम निचरा होणा-या ठिकाणी पूर्नलागवड करावी. डॉ. बा.सा. कोकण कृषी विदयापीठाने शिफारस केल्याप्रमाणे भाजीपाला पीकांना खताची मात्रा दयावी. भाजीपाला क्षेत्रामध्ये उगवलेल्या तणांची बेणणी करावी. तसेच नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासून संरक्षण करावे. |
| दुभती जनावरे व शेळया | | बहुवर्षीय स्वरुपाच्या वैरणीच्या पीकाची उदा. पॅरग्रास, यशवत, नेपीयर इ. लागवड करण्यासाठी शेताची पूर्वतयारी करण्यास सूरुवात करावी.<br>गायी, म्हैशी आणि शेळयांना पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली धनुर्वात रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे. लसीकरणानंतर उत्तम रोगप्रतिकारक शक्ती निमार्ण होण्यासाठी चांगला आहार दयावा. विजांपासून संरक्षणासाठी जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधावे |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

डॉ. प्रदिप च. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ओफिसर
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१